# मुस्लिमविरोधी विधान करणं हा महायुतीत सत्तेचा राजमार्ग झालाय का ?विश्लेषक काय सांगतात ?



### अशी विधानं प्रसिद्धीसाठी

राज्यात अलीकडे ठिकठिकाणी सातत्याने हिंदू जनआक्रोश मोर्चे काढले जात आहेत. लव्ह जिहाद, लँड जिहाद, मुस्लिमांकडून खरेदी न करणे अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवरून सातत्याने मुस्लीमद्वेषी विधानं करण्याचा सिलसिला सध्या सुरू आहे. हिंदू महिला आणि मुलींनी जिममध्ये जाऊ नये. तिथे ट्रेनर मुस्लीम आहेत का पाहा? कारण ते हिंदू मुलींवर अन्याय करतात, असं एक वादग्रस्त विधान गोपिचंद पडळकरांनी नुकतंच केलेलं आहे. त्याआधी, अहिल्यानगरमधील आमदार संग्राम जगताप यांनी, दिवाळीत धर्म बघून दुकानातून खरेदी करण्याचं आवाहन केलं आणि ते एकाएकी चर्चेत आले. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असूनही असं 'मुस्लीमद्वेषी' विधान केल्यामुळे आता यशवंतराव चव्हाण यांचा वारसा सांगणारे उपमुख्यमंत्री अजित पवार काय बोलणार, अशा अनुषंगाने इलेक्ट्रॉनिक माध्यमांवर चर्चा झडू लागल्या.

### 'पक्षाच्या वरदहस्ताशिवाय अशी विधानं शक्य नाहीत'

अशा विधानांमागची कारणं स्पष्ट करताना वसंत भोसले सांगतात की, वैयक्तिक पातळीवर प्रसिद्धी मिळणं, पक्षात महत्त्व मिळणं आणि मूळ भाजपचे हे लोक नसल्यामुळे 'भाजपची ही भूमिका नाही', असा मेसेज जाण्याची सोय, ही या पाठीमागची कारणं आहेत. तसेच, हिंदू-मुस्लीम हा द्वेषाचा अजेंडाही यातून भाजपला कायम ठेवता येतो. तो कायम ठेवणं हे त्यांच्यादृष्टीने फार महत्त्वाचं आहे, असंही ते सांगतात. विजय चोरमारे यासाठी गोपिचंद पडळकर यांचं उदाहरण देतात.





**मुंबई । दिव्य न्युज**

**धार्मिक विद्वेष, सामाजिक सलोख्याला गालबोट, धार्मिक उन्माद, आणि चिथावणीखोर वक्तव्यांची सातत्यपूर्ण मालिका... हा गेल्या काही महिन्यांत काही ठरावीक नेत्यांकडून दिसणारा पॅटर्न. कधी नितेश राणे, कधी गोपिचंद पडळकर, कधी संग्राम जगताप तर कधी महेश लांडगे... विधिमंडळात आमदार पदावर असणारे आणि संवैधानिक मूल्यांची शपथ घेतलेले लोकप्रतिनिधीच अशी विधानं सातत्याने करताना दिसत आहेत. याआधी 'सेक्यूलर' पक्षात असणारे नितेश राणे आता कट्टर हिंदूत्वाची शाल पांघरून वावरताना दिसतात, तर अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत असूनही संग्राम जगताप मुस्लीमविरोधी वक्तव्यं करताना दिसतात. असं का घडतंय? प्रसिद्धी मिळवण्यासाठी अशी वक्तव्यं केली जात आहेत का? की महायुतीच्या सत्तेत महत्त्व मिळवण्यासाठी हा एक राजमार्ग झाला आहे?**

त्यांना तंबी दिली गेली आणि कारणे दाखवा नोटीस पाठवली जाईल, असं विधानही अजित पवार यांच्याकडून आलं. पण, दरम्यानच्या काळात या विधानामुळे आमदार जगताप यांना मिळाली ती प्रसिद्धी! त्यामुळे, अशी विधानं प्रसिद्धीसाठी केली जातात, असा मुद्दा ज्येष्ठ पत्रकार विजय चोरमारे यांनी बीबीसी मराठीशी बोलताना मांडला. चोरमारे म्हणाले की, अशी मुस्लीमद्वेषी विधानं करणाऱ्या सगळ्या आमदारांमधला समान धागा एकच आहे. तो म्हणजे, राज्यात २८८ आमदार आहेत. त्यातूनही आपल्याला लाईमलाईटमध्ये यायचं असेल तर फक्त आणि फक्त धार्मिक द्वेषाची भूमिका हीच आपल्याला सहाय्याची ठरू शकते, असा आत्मविश्वास त्यांना आला आहे. ज्येष्ठ पत्रकार राजेंद्र साठेदेखील हाच मुद्दा पुढे नेत म्हणाले की, अधिकाधिक आक्रमकरित्या बोललं तर माध्यमांचं लक्ष आपल्याकडे जातं. प्रत्यक्ष लोकांमध्ये जाऊन काम करून प्रसिद्धी मिळायला जेवढे कष्ट लागतील, त्यापेक्षा ही प्रसिद्धी अधिक स्वस्तातील आहे, असं त्यांना वाटतं. एखादं जरी असं वक्तव्य केलं तरी ही प्रसिद्धी मिळते, असा आत्मविश्वास त्यांना आला आहे, असं ते सांगतात. विजय चोरमारे यांच्या मते, मुस्लीमद्वेषी भूमिका घेतल्यामुळे आपण राज्याचे हिरो बनतो, असं त्यांना वाटतं. अन्यथा, एका मतदारसंघाबाहेर असं या आमदारांचं अस्तित्वच काय आहे? पात्रता आणि योग्यता तरी काय आहे? आमदार म्हणून असलेलं कर्तृत्व तरी काय आहे? संग्राम जगताप किंवा संग्राम भंडारे या लोकांना महाराष्ट्रात याआधी कुठे ओळख होती, असा सवाल राजेंद्र साठे उपस्थित करतात.

## आमदार कर्डिले साहेब यांच्या निधनामुळे धक्का बसला, डॉ.सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केली हळहळ



अहमदनगर । दिव्य न्युज

राहुरी-नगर-पाथर्डी विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आणि ज्येष्ठ नेते शिवाजीराव कर्डिले यांच्या आकस्मिक निधनाने संपूर्ण जिल्हा शोकसागरात बुडाला आहे. फक्त ६६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने सामाजिक, राजकीय आणि सहकार क्षेत्रात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

कालच आमदार कर्डिले हे डॉ. सुजय विखे पाटील यांच्या निवासस्थानी गेले होते. एकत्र जेवण, संवाद आणि विविध विषयांवर चर्चा झाल्यानंतर काही तासांतच त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. ही वार्ता हृदय पिळवटून टाकणारी आहे. अजूनही मला विश्वास बसत नाही की ही घटना घडली आहे. कालच आम्ही एकत्र होतो आणि आज ते आपल्यात नाहीत, हे स्वीकारणं कठीण आहे, अशी प्रतिक्रिया डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिली. ते पुढे म्हणाले, कर्डिले साहेबांशी आमचे मैत्रीपूर्ण संबंध संपूर्ण जिल्ह्याला ठाऊक आहेत. विखे आणि कर्डिले परिवार मागील अनेक दशकांपासून एकत्र राहिले आहेत. राजकीय क्षेत्रात आम्ही नेहमी खांद्याला खांदा लावून काम केलं. माझ्या दृष्टिकोनातून ते अहिल्यानगर जिल्ह्याचे एक राजकीय गुरु होते. त्यांच्या जाण्याने केवळ आम्हीच नव्हे तर संपूर्ण महायुती आणि भारतीय जनता पक्षाला मोठा धक्का बसला आहे. शिवाजीराव कर्डिले यांनी आपल्या दीर्घ राजकीय प्रवासात सहकार, शेती, शिक्षण आणि पायाभूत विकास क्षेत्रात अमूल्य योगदान दिलं. अहमदनगर जिल्हा बँकेचे चेअरमन, राज्यमंत्री आणि जनतेचे खरे हितचिंतक म्हणून त्यांनी लोकांशी थेट नाळ जोडली होती. साधेपणा, लोकाभिमुख कार्यशैली आणि प्रामाणिक सेवाभाव या गुणांनी त्यांचं व्यक्तिमत्त्व उठून दिसलं. त्यांच्या जाण्याने केवळ एक जननेता हरपला नाही, तर जनसेवेची एक परंपराच खंडित झाली आहे. त्यांचे आदर्श आणि कार्यशैली हीच आपल्यासाठी प्रेरणास्थान आहेत. त्यांच्या विचारांची वाटचाल पुढे नेणं हेच त्यांच्याप्रती खरं श्रद्धांजलीचं रूप ठरेल, असं डॉ. विखे पाटील म्हणाले. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि हे दुःख सहन करण्याची शक्ती त्यांच्या परिवारास लाभो, अशा शब्दांत डॉ. विखे पाटील यांनी श्रद्धांजली अर्पण केली.

## मराठवाडा पदवीधर मतदारसंघ निवडणूक २०२६ साठी मतदार नोंदणी करा-कादरी शाहेद



औरंगाबाद । दिव्य न्युज

आगामी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाच्या २०२६ च्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने जाहीर केला असून, या पार्श्वभूमीवर पदवीधरांसाठी मतदार नोंदणीची प्रक्रिया सुरू झाली आहे.

सुशिक्षित वर्गाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या निवडणुकीत सहभागासाठी नवीन मतदार नोंदणी करणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

मतदार नोंदणीसाठी पात्र असलेल्या सर्व पदवीधरांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेचा पुरावा, निवासाचा पुरावा आणि पासपोर्ट आकाराचा फोटो सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन तसेच प्रत्यक्ष अर्ज आपल्या तेहसील कार्यल्यात स्वीकारले जाणार आहेत.या निमित्ताने संघटनेचे सर्व पदाधिकारी यांच्या पुढाकाराने विशेष मतदार नोंदणी अभियान हाती घेण्यात आले आहे. या अभियानाचा उद्देश म्हणजे सुशिक्षित, विचारशील आणि जबाबदार नागरिकांना मतदान प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी करून घेणे, असे क्रांतिकारी शिक्षक संघटना महाराष्ट्र राज्यचे संथापक सचिव कादरी शाहेद यांनी सांगितले.

संघटनेच्या वतीने प्रसिद्ध करण्यात आलेल्या आवाहनात म्हटले आहे की, आपण शिक्षणाने सक्षम, विचारशील आणि समाजासाठी जबाबदार आहोत. मतदान हा फक्त अधिकार नाही, तर समाजाच्या भविष्याचा पाया आहे. प्रत्येक मताचा निर्णय आपल्या गावाचे, शहराचे आणि कुटुंबाचे भवितव्य ठरवू शकतो. आज आपल्या मतातूनच प्रामाणिक नेतृत्व, पारदर्शक प्रशासन आणि न्याय्य समाजव्यवस्था घडवता येईल तसेच नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की,आपली नोंदणी करून समाजाच्या विकासात हातभार लावा. शिक्षित समाजाच्या ताकदीचे दर्शन घडवा आणि आपल्या हक्काचा उपयोग करून लोकशाही मजबूत करा. आगामी काही आठवड्यांत विविध महाविद्यालये, शैक्षणिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांच्या माध्यमातून जनजागृती उपक्रम राबवले जाणार आहेत. प्रशासनाने पदवीधरांना वेळेत नोंदणी करून आपले नाव मतदार यादीत समाविष्ट करण्याचे आवाहन केले आहे. तसेंच संघटनेचे इतर पदाधिकारी शाफी सर,अय्युब सर ,गायकवाड सर, आसरार सर,पवार सर,पटेल सर, सगीर सर,मुबीन सर,राजू सर यांच्याशी संपर्क साधावा.

## ऐतिहासिक कारंजा टॉवर समोरील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे बंद पडले

### पूर्ववत सुरू करा अन्यथा तीव्र आंदोलन-रमेश गंगाधरे,एस.एम.युसूफ़

बीड । दिव्य न्युज

गेल्या काही महिन्यांपासून ऐतिहासिक कारंजा टॉवर समोरील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे बंद पडले आहेत. ते पूर्ववत सुरू करण्यात यावे अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेश गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी बीड नगरपरिषदचे मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

याविषयी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, बीड शहराच्या मध्यभागी असलेली ऐतिहासिक कारंजा टॉवरची इमारत ही बीड शहराची ओळख आहे. मात्र बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाच्या दुर्लक्षपणामुळे या इमारतीला अवकळा आली आहे. या इमारतीकडे बीड नगरपालिकेसह जिल्हा प्रशासनाने लक्ष द्यावे, याकरिता आतापर्यंत अनेकदा निवेदने देण्यात आलेली आहेत परंतु शासकीय-प्रशासकीय यंत्रणे कडून अद्यापही याची दखल घेतली गेलेली नाही. सध्या शाळांना दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या आहेत. यामुळे बीड शहरासह परगावाहून आजोळी आलेली मुलं-मुली ऐतिहासिक कारंजा टॉवर व त्यासमोरील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे फवारे पाहून आनंद घेण्याकरिता पालकांसोबत मोठ्या संख्येने येऊ लागले आहेत. येथील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे फवारे धडाडीचे सामाजिक कार्यकर्ते मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग यांनी काही महिन्यांपूर्वी पुढाकार घेत स्वतःच्या पदरमोडसह लोकवर्गणी करून सुरू केले होते व गेली अनेक महिने जातीने लक्ष देऊन ते चालविले परंतु आता त्यांच्या मागील कामाच्या व्यापामुळे त्यांना याकडे लक्ष देता येईना. म्हणून गेल्या दोन-तीन महिन्यांपासून येथील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे बंद पडले आहेत. मात्र बीड शहरातील नागरी समस्यांसह ऐतिहासिक ठेवा असलेल्या वास्तूंची निगा राखणे त्यांचे जतन करणे बीड नगर परिषद चे नैतिक कर्तव्य असून सुद्धा बीड नगर परिषद कडून याकडे लक्ष दिले जात नाहीये. यामुळे येथील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे गेल्या दोन-तीन महिन्यांपासून बंद पडले आहे. ते पूर्ववत सुरू व्हावे आणि या ऐतिहासिक वास्तुसह येथील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे पाहण्याकरिता आपल्या पालकांसह येणारी मुले-मुली




हिरमुसली होऊ नये, येथील नयनरम्य दृश्य पाहण्याचा आनंद त्यांना मिळावा. याकरिता या ऐतिहासिक कारंजा टॉवर समोरील रंगबिरंगी लाइट्स आणि पाण्याचे कारंजे पूर्ववत सुरू करण्याकरिता आवश्यक कार्य करावे अन्यथा ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी बीड नगरपालिकेसमोर लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करण्यात येईल. असा इशारा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे आणि मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी मुख्याधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

## अ‍ॅड.प्रकाश कवठेकर यांना माता सावित्री फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर



मुंबई । दिव्य न्युज

बीड येथील तेजस ग्रुपचे चेअरमन तथा माजी जिल्हा परिषद सदस्य ड प्रकाश दादा कवठेकर यांना माता सावित्री / फातिमा सार्वजनिक वाचनालय कुर्ला ( पूर्व ) मुंबई यांच्या वतीने माता सावित्री / फातिमा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे.

याबाबत थोडक्यात माहिती अशी की, बीड येथील उद्योग क्षेत्रामध्ये नाव कमवलेले व मनमिळावू स्वभाव गरजूंना मदतीचा ध्यास सामाजिक कार्याची आवड आणि आदर्श व्यक्तिमत्व या गुणामुळे ड प्रकाश दादा कवठेकर यांनी अल्पावधीतच जनमानसात ठसा उटवला आहे. सर्वसामान्य कुटुंबातून स्वतःच्या हिमतीवर प्रगती करून युवकासमोर प्रेरणादायी आदर्श उभा केला आहे. स्वतः नोकरी न करता व्यवसायामध्ये तेजस इलेक्ट्रिकल च्या माध्यमातून व्यवसायाला सुरुवात केली आणि आज ऑक्सितेज मिनरल वॉटर, तेजस प्रोडक्शन कंपनी, तेजस अर्थमूव्हर्स, तेजस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, तेजस डिजिटल मार्केटिंग आदी, या उपक्रमाद्वारे आणि आपल्या सामाजिक बांधिलकी जपत कायम आपल्या कार्याचा वेगळा ठसा उमटवला आहे. त्यांच्या या कार्याबद्दल वाचनालयाच्या वतीने समाजभूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येणार असून हा पुरस्कार सोहळा दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सायंकाळी ७ वाजता माननीय बाळासाहेब ठाकरे समाज केंद्र नेहरूनगर कुर्ला (पूर्व) मुंबई येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडणार आहे. या सोहळ्यास उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकाने वतीने केले आहे.

## ६९९ आक्षेप-हरकती दाखल; वाढलेल्या प्रभागामुळे गोंधळ

### बीड नगरपालिका निवडणूक : नगरपालिका करणार स्थळ पाहणी




### नगरपालिकेमध्ये वाढली इच्छुकांची गर्दी

नगरपालिकेत प्रशासक आल्यापासून कोणीही फिरकत नव्हते. परंतु जशीच निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली, तशीच भावी नगरसेवक, नगराध्यक्षांची पालिकेमध्ये गर्दी होण्यास सुरुवात झाली. आतापर्यंत हे सर्व लोक घरीच बसून होते, आता त्यांना जनतेच्या समस्या दिसू लागल्याचा आरोप होत आहे.

> शुक्रवारपर्यंत ६९९ हरकती, आक्षेप आले होते. आता स्थळ पाहणी करून ३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व मतदार याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत.
>
> **शैलेश फडसे, मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड.**

बीड । दिव्य न्युज :

आगामी बीड नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर तयार करण्यात आलेल्या मतदार यादी आणि प्रभाग रचनेवर नागरिकांकडून तब्बल ६९९ आक्षेप आणि हरकती दाखल झाल्या आहेत. शहरात प्रभागांची संख्या वाढल्याने आणि पालिकेच्या सर्वेक्षणामधील चुकांमुळे हा गोंधळ वाढल्याचे दिसून येते.

बीड शहरात यापूर्वी २५ प्रभाग होते; परंतु आता यामध्ये १ प्रभाग वाढवून एकूण २६ प्रभाग झाले आहेत. प्रभागांची संख्या वाढल्याने अनेक जुन्या प्रभागांची फाटाफूट झाली आहे. त्यामुळे अनेक मतदारांची नावे त्यांच्या मूळ प्रभागातून दुसऱ्या प्रभागात गेल्याने मोठी गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या गोंधळात पालिकेने मध्यंतरी केलेल्या सर्वेक्षणातही चुका झाल्यामुळे हरकतींची संख्या वाढली आहे. दाखल झालेल्या हरकतींमध्ये दोन मुख्य प्रकार आहेत. स्वतःच्या नावावरील हरकती यामध्ये मतदाराचे नाव यादीत नसल्यास किंवा नाव, पत्ता यात चूक असल्यास स्वतःहून केलेली दुरुस्तीची मागणी आणि दुसरी दुसऱ्या व्यक्तीच्या नावावर आक्षेप घेणे किंवा ते वगळण्याची मागणी करणे. या हरकती आणि आक्षेपांवर आता नगरपालिकेकडून स्थळ पाहणी केली जाणार आहे. या स्थळ पाहणीनंतर आलेल्या हरकतींवर निर्णय घेतला जाईल. ३१ ऑक्टोबर रोजी मतदान केंद्रनिहाय अंतिम याद्या प्रसिद्ध केल्या जाणार आहेत. यानंतर बीड नगरपालिका निवडणुकीचा मार्ग अधिक स्पष्ट होणार आहे.

## पदवीधर मतदारांना मराठवाडा विभागातील पदवीधर मतदार नोंदणी नव्याने करणे बंधनकारक-अरफात सर



बीड । दिव्य न्युज

बालेपीर व परिसरातील सर्व पदवीधर मतदारांना मराठवाडा विभागातील पदवीधर मतदार नोंदणी नव्याने करणे बंधनकारक असल्याची माहिती अरफात सर यांनी दिली आहे.

दि. १ ऑक्टोबर २०२५ पासून नवीन नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून, याआधीची सर्व नोंदणी रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे आगामी निवडणुकांमध्ये मतदानाचा हक्क बजावण्यासाठी नव्याने नोंदणी आवश्यक आहे, असे आवाहन करण्यात आले आहे.

नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे: १) पासपोर्ट साईज दोन रंगीत छायाचित्रे २) पदवी प्रमाणपत्र किंवा अंतिम वर्षाचे गुणपत्रक ३) आधारकार्ड व मतदान ओळखपत्र ४) अचूक भरलेला फॉर्म क्रमांक १८ ५) नाव बदल झाल्यास गॅझेट किंवा विवाह प्रमाणपत्र नोंदणीसाठी ऑफिस ऑफ अरफात सर, रौशनपूरा, गली क्र. ३, बालेपीर, बीड मो. ९६५७६६०३७० अरफात सर यांनी सर्व पदवीधरांना आवाहन केले आहे की, आपल्या मताचा हक्क सुनिश्चित करण्यासाठी ही नोंदणी प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करावी.

## पक्ष एक गट अनेक, सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीची बीड शहरात दयनीय अवस्था

# आधे इधर, आधे उधर बाकी के किधर





### क्षीरसागरांचा प्रवेशही 'अटी'त अडकला

एकेकाळी राष्ट्रवादीतील महत्त्वाचे नेते जयदत्त क्षीरसागर मागच्या सहा वर्षांपूर्वी पक्षातून बाहेर पडले. एकदा शिवसनेकडून पराभव व मागच्या वेळी अपक्ष उमेदवारीतून माघार घेतल्यानंतर आता ते कोण्याही पक्षाच्या माध्यमातून राजकीय प्रवाहात येण्याच्या तयारीत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस प्रवेशाचीही त्यांनी चाचपणी केली. मात्र, तालुक्याचे नेतृत्व हाती (जयदत्त व डॉ. योगेश क्षीरसागर यांच्याकडे) द्यावे, अशी त्यांची प्रमुख अट आहे.

### बॅनरवर केवळ पवार, तटकरे; जिल्हाध्यक्षांनीही बोलावली बैठक

दरम्यान, डॉ. क्षीरसागरांनी बोलविलेल्या बैठकीच्या बॅनरवर पक्षाध्यक्ष अजित पवार व प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे या दोघांचेच फोटो होते. एरव्ही डॉ. क्षीरसागरांच्या बॅनरवर आमदार धनंजय मुंडेंसह कधी चुलते जयदत्त क्षीरसागर, वडील डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचेही फोटो असतात. त्यातच आता जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनीही रविवारी (ता. १९) नगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगानेच पक्षाची बैठक बोलावल्याने डॉ. क्षीरसागरांची बैठक नेमकी कशासाठी, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.

बीड । दिव्य न्युज

**आरक्षणासह इतर प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्याने नगरपालिका निवडणुकीचा शंख कधीही फुंकला जाऊ शकतो. त्यातुळे आता सर्वच पक्षांत तयारी सुरू झाली आहे. मात्र, राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार पालकमंत्री असलेल्या बीड जिल्ह्यातील सर्वांत मोठ्या बीड नगरपालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेतृत्वाचा पेच निर्माण झाला आहे. 'आधे इधर, आधे उधर' अशी स्थिती सध्या पक्षात आहे.**

पालिका आणि क्षीरसागर यांचे ३० वर्षांपासूनचे अतूट बंधन. सर्वाधिक काळ नगराध्यक्ष असल्याचा डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांचा विक्रम, २०१२ च्या निवडणुकीत सर्वपक्षीय आघाडीला ५० पैकी केवळ एका जागेवर समाधान अशी त्यांची ताकद. मात्र, मागच्या निवडणुकीत त्यांना पुतणे संदीप क्षीरसागर यांनीच आव्हान दिले. परंतु, आमदार क्षीरसागरांसह एमआयएमचे नगरपालिकेतील अनेक शिलेदारही पुन्हा आपल्या तंबूत आणण्यात डॉ. क्षीरसागर यशस्वी झाले. मात्र, त्यांचा वारसा चालविणारे पुत्र डॉ. योगेश क्षीरसागर यांच्यापासून पालिकेतील वडिलांचे निष्ठावंत शिलेदार दुरावले आहेत. विधानसभा निवडणुकीत पक्षाने मध्यस्थी केल्याने पक्षांतर्गत विरोधकांचीही 'दगडापेक्षा वीट मऊ' (आमदार संदीप क्षीरसागर कट्टर विरोधक असल्याने पक्षाचा प्रचार बरा या अर्थाने) अशी स्थिती झाल्याने या मंडळींनी डॉ. योगेश क्षीरसागर यांचा प्रचार केला. मात्र, त्यानंतर वर्षभरात दुरावलेल्यांना पुन्हा जवळ करण्यात त्यांना यश आले नाही. आता निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करत असताना पक्षातील बहुतांश माजी नगरसेवक त्यांच्यापासून दूर होत माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या नेतृत्वात आहेत. गुरुवारी (ता. १६) डॉ. योगेश व डॉ. सारिका क्षीरसागर यांनी आयोजित केलेल्या कार्यकर्ता बैठकीला भीमराव वाघचौरे, किशोर काळे, गणेश वाघमारे, भास्कर जाधव, नरसिंग नाईकवाडे, शिवाजी जाधव, अशोक वाघमारे, विकास जोगदंड, प्रेम चांदणे, रवी जवेरी, बाळासाहेब जाधव, सुभाष सपकाळ, मुस्तफा शेख, नशीर अन्सारी, बाळासाहेब आंबेकर, महेश गजें, बाळासाहेब गुंजाळ, रवींद्र कदम अशी मोजकीच जनमत असलेली मंडळी होती. फारुक पटेल, विनोद मुळूक, अमर नाईकवाडे, विलास विधाते, दिनेश मुंदडा, शेख निझाम, रमेश चव्हाण, बाबूराव दुधाळ हो शहरात जनमत आणि पालिका राजकारणात असलेली अवलिया मंडळी मात्र अनुपस्थित होती. यावरून 'आम्हाला तुमचे नेतृत्व अमान्य' असा स्पष्ट संदेशच या मंडळींनी दिला. त्यामुळे पक्षाची शहरात ताकद असली तरी गटबाजी आणि निवडणुकीत नेतृत्व कोणाकडे, हा मुख्य पेच आहे.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या बीड शहर अध्यक्षपदी निसार शेख



बीड । दिव्य न्युज

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) च्या बीड जिल्हा संघटनेत नवीन संघटनात्मक बदल करण्यात आला असून, पक्षाच्या वतीने निसार शेख यांची रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात) बीड शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.या बाबतचे नियुक्तीपत्र १६ ऑक्टोबर २०२५ रोजी जिल्हाध्यक्ष जीवन गायकवाड यांनी यांच्या हस्ते देण्यात आले आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष सचिन खरात साहेब यांच्या विचारधारेनुसार समाजातील वंचित, शोषित, पीडित, बहुजन समाज व घटक यांना न्याय मिळवून देण्यासाठी

►► पान २ वर

## माजलगाव शहरातील चांदणी ग्राउंड मधील रस्त्याची दुर्दशा पाईपलाईनच्या कामामुळे नागरिकांची गैरसोय



माजलगाव । दिव्य न्युज

शहरातील चांदणी ग्राऊंड परिसरातील रहिवाशांनी नगर परिषदेच्या पाईपलाईन कामाच्या निष्काळजीपणाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. पाईपलाईन टाकण्यासाठी खोदलेला रस्ता अर्धवट अवस्थेत सोडून एकही कनेक्शन न देता खोदलेला रस्ता परत बुजून टाकल्यामुळे सर्वत्र चिखल आणि खड्डे झाले आहेत, ज्यामुळे पादचारी आणि वाहनचालकांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

सईद भाई यांच्या घरापासून ते ताजुभाई अतार यांच्या घरापर्यंत पाईपलाईन टाकण्याचे काम नगर परिषदेने हाती घेतले होते. मात्र, काम पूर्ण न करताच काम बंद केले आहे ज्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. गुडघ्यापर्यंत चिखल झाल्याने रस्त्यावरून चालणेही कठीण झाले आहे. याव्यतिरिक्त, पाईपलाईन टाकल्यानंतर नागरिकांना नळ कनेक्शन देणे आवश्यक असताना, ते न देताच काम अर्धवट सोडण्यात आले आहे. यामुळे शाळकरी मुले, महिला आणि वयोवृद्धांसह सर्वांनाच त्रास होत आहे. जेव्हा नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे विचारणा केली, तेव्हा त्यांना निवडणुकीनंतर काम पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले, जे

►► पान २ वर

## जिंतूरमध्ये गांजा तस्करी करणारे दोन तरुण गांजासह अटक : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

जिंतूर । दिव्य न्युज : सालेह चाऊस

जिंतूर पोलीस स्टेशन हद्दीतील जिंतूर-जालना रोडवरील मालेगाव तांडा पाटीजवळ गुरुवारी (दि. १६ ऑक्टोबर २०२५) सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने एका मोठ्या कारवाईत गांजा तस्करांना ताब्यात घेतले. त्यांच्या जवळून एकूण २.५४० किलो गांजा, दोन मोबाईल फोन, आणि काळ्या रंगाची युनिकॉर्न मोटारसायकल असा सुमारे १,४०,००० किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.





ही कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर भागवत जगताप (वय ४० वर्षे, स्थानिक गुन्हे शाखा, परभणी) यांच्या फिर्यादीवरून करण्यात आली असून, गुन्हा क्र. ५५६/२०२५ असा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात कलम २०(ब)२(ब), २२ एनडीपीएस कायदा १९८५ सह कलम ३(५) बीएनएस अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. आरोपी गणेश संजय शिंदे (वय २२ वर्षे, रा. नामदेव नगर, जिंतूर),योगेश जगन्नाथ राठोड (वय २५ वर्षे, रा. नामदेव नगर, जिंतूर) दोन्ही आरोपींना गांजा विक्री करण्याच्या उद्देशाने विनापरवाना बेकायदेशीररीत्या आमली पदार्थ ताब्यात ठेवतांना पकडण्यात आले. त्यांच्याकडून खालील वस्तू जप्त करण्यात

►► पान २ वर

## पदवीधर मतदार संघामध्ये नाव नोंदणी करा– फरकूंद आली बेग

बीड । दिव्य न्युज



मराठवाडा पदवीधर मतदारसंघाची निवडणूक जवळ आलेली आहे सुरक्षित बेरोजगार सर्व जाती जमाती मधील युवकांनी या मतदारसंघांमध्ये नाव नोंदणी करावी जेणेकरून आपल्याला विधान परिषद मध्ये निवडून आल्यानंतर जायची संधी आहे आतापर्यंत बेरोजगाराचे प्रश्न कोणी सोडविले नाही आता आपल्याला संधी आलेली आहे पदवीधर मतदारसंघांमध्ये निवडणूक लढवायची पदवीधाराची ताकद दाखविण्यासाठी या मतदारसंघांमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे तरी सर्वांनी या पदवीधर मतदारसंघांमध्ये नोंदणी करावी असे आव्हान काँग्रेसचे ज्येष्ठ नेते फरकंद आली बेग यांनी केले आहे.







## चकलंबा जि.प.गटातुन परमेश्वर वाघमोडे निवडणूक लढवण्याचा निर्धार!

### चकलांबा गटात जिल्हा परिषदसाठी परमेश्वर वाघमोडे महाराज यांच्या नावाची चर्चा



चकलंबा । दिव्य न्युज (सय्यद गफ्फार)

गेवराई तालुक्यातील चकलंबा जिल्हा परिषद गटातुन परमेश्वर महाराज वाघमोडे सर यांनी निवडणूक लढविण्याचा निर्धार केला असुन, सतत जनतेत असणारा नेता अशी त्यांची ओळख आहे, राजकारणा बरोबरच समाजकारण अशी त्यांची विचार धारा असुन, अनेकांना संकट काळी देवदुता प्रमाणी धावुन जाण्याची धमक त्यांच्या रक्तात आहे, गेवराई तालुक्यातील अत्यंत महत्वाचा समजला जाणारा चकलंबा जिल्हा परिषद गट हा जिल्हा परिषदीचे नांदी ठरला आहे, अहिल्यानगर जिल्हाच्या सरहद्दी लगद असणारा गट आहे, सर्व जाती धर्माचे जनता या गटात राहाते, जिवाला जिव देणारे देव माणसे येथेच अशी अगळी वेगळी रचना असणाऱ्या जि,

►► पान २ वर

## अडीच वर्षांनंतर बीड होणार स्वच्छ, २० घंटागाड्यांसह 3 टेम्पो मिळाले

### स्वच्छतेचा प्रश्न सुटला : दिवाळीनंतर १७ नवीन वाहने मिळणार













बीड । दिव्य न्युज

मागील अडीच वर्षांपासून बीड पालिकेकडून स्वच्छतेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात होते. त्यामुळे शहरात सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. पालिकेने आणि पालकमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या पुढाकारातून जिल्हा नियोजन समितीतून मिळालेल्या निधीतून अखेर नव्या २० घंटागाड्या आणि ३ टेम्पो मिळाले. पहिल्या ७ अशा एकूण २७ घंटागाड्यांसह जुनी यंत्रणा शहरात कार्यरत असल्याने दिवाळीच्या सणात

►► पान २ वर

### दररोज ७२ टन कचरा

शहरात ७० हजार प्रॉपर्टी आहेत. याशिवाय हद्द वाढ भागातील असा एकूण दररोज शहरात ७२ टन कचरा आहे. आता हा कचऱ्याचा प्रश्न कायम सुटल्याने शहर स्वच्छ होत आहे. रस्त्यावर कचरा फेकण्याचे प्रमाण कमी झाल्याने धूळही कमी होईल.







हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहम्मद अबुबकर यांनी माऊली ऑफसेट एमएसईबी ऑफीससमोर माळीवेस बीड येथे छापून सां.दिव्यवार्ता कार्यालय कोहिनूर बेकरीजवळ, इस्लामपुरा रोड, बाबा चौक, भालदारपुरा बीड येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधुन व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.वाद विवाद बीड न्यायालय अंतर्गत मो.९३७१२९१०४२, ९५४५३८१२२०, फोन नंबर : ०२४४२–२३१२२०, फॅक्स नंबर : ०२४४२–२३१२२०